# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
## राष्ट्रीय सेवा योजना

गणेशखिंड, पुणे - ४११ ००७.

डॉ. संजयकुमार दळवी
एम्.एस्सी.,पीएच्.डी.
प्र. कार्यक्रम समन्वयक

कार्यालय क्र. : ०२०-२५६९७३४१
०२०-२५६०११५३
०२०-२५६०११६०
फॅक्स क्र. : ०२०-२५६९७३४१


संदर्भ : रासेयो/१८५/१४ दि. ०८/१०/२०१४

प्रति,
मा. प्राचार्य/मा. संचालक
सर्व संलग्नीत महाविद्यालये व मान्यता प्राप्त संस्था
रासेयो संलग्नीत महाविद्यालये
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
पुणे-४११ ००७.

**विषय : आगामी महाराष्ट्र विधानसभा निवडणूक २०१४ बंदोबस्ताकरीता स्वयंसेवक सहभागी होणे बाबत...**

**संदर्भ** : जा.क्र./१०८८/२०१४, वाहतुक शाखा, नियंत्रण कक्ष, पुणे शहर, दि. १/१०/२०१४

**महोदय,**

मा. पोलीस उप आयुक्त, वाहतूक, पुणे शहर यांनी पाठविलेल्या वरील संदर्भीय पत्रानुसार आपणांस कळविण्यात येते की, आगामी महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीमध्ये बंदोबस्ताकरीता स्वयंसेवकांना पोलीस खात्यामध्ये राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवक 'पोलीस मित्र' म्हणून सहकार्य करण्यासंदर्भात कळविण्यात आले आहे. पुणे शहरातील महाविद्यालयांमधून पोलीस मित्र स्वयंसेवक यांना एकदिवसीय निवडणूक बंदोबस्त प्रशिक्षण देण्यात येणार आहे.

या 'पोलीस मित्र' निवडणूक बंदोबस्त प्रशिक्षणासाठी एकदिवसीय प्रशिक्षणाचा आराखडा मा. पोलिस आयुक्त, पुणे शहर यांना देण्यात आला आहे. या प्रशिक्षणादरम्यान रासेयो स्वयंसेवकांना ओळखपत्र, बंदोबस्त प्रभाग व बंदोबस्त पूर्णतेनंतर प्रमाणपत्र देण्यात येणार आहे. पुणे शहरात एकूण १०९ रासेयो संलग्नीत महाविद्यालये आहे. यामध्ये पुणे शहर, पिंपरी-चिंचवड व खडकी कॅन्टोन्मेट असा समावेश आहे. तरी आपल्या महाविद्यालयातील स्वयंसेवकांना महाराष्ट्र विधानसभा निवडणूक-२०१४ कालावधीमध्ये पुणे शहरात बंदोबस्ताकरीता पोलिस मित्र प्रशिक्षणासाठी पोलीस मुख्यालय, शिवाजीनगर, पुणे याठिकाणी दि. १०/१०/२०१४ रोजी स. १०.०० वा. पाठविण्यात यावे.

पोलीस मित्र म्हणून दि. १४/१०/२०१४ ते १६/१०/२०१४ असे तीन दिवस निवडणूक कालावधीत बंदोबस्ताचे काम करण्याकरीता आपल्या महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांना दिलेल्या सुचनेनुसार पाठविण्यात यावे, ही विनंती. सदर खर्च राष्ट्रीय सेवा योजना नियमित कार्यक्रमातून करण्यात यावा. कळावे, धन्यवाद !

**संपर्क: वाहतुक विभाग** : ०२०-२६१२२०००, ०२०-२६२०८२२५
०२०-२६२०८३६७, ०२०-२६२०८३१७, ०२०-२६२०८२२१

8/10

प्र. कार्यक्रम समन्वयक
राष्ट्रीय सेवा योजना